# चंद्रलिपी

गिरिजा कीर

रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**चंद्रलिपी**
गिरिजा कीर

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
गिरिजा कीर
५, झपूर्झा, साहित्य सहवास,
वांद्रे (पू.) मुंबई- ५१
फोन नं. ०२२-२६५९०८८२

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २५०/-

# चंद्रलिपी

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | निळावंतीच्या जगात तीस दिवस | ...................... | ७ |
| २. | खानजादेची कविता | ...................... | १७ |
| ३. | ती आणि मारिओ पुझो | ...................... | २९ |
| ४. | दाद | ...................... | ३९ |
| ५. | बार्गेन | ...................... | ४५ |
| ६. | ते तीन नायक | ...................... | ५४ |
| ७. | चकवा | ...................... | ६२ |
| ८. | प्रवास | ...................... | ६८ |
| ९. | दहा वर्षांनंतर | ...................... | ७६ |
| १०. | तोल | ...................... | ८४ |
| ११. | आभाळाएवढी | ...................... | ९३ |
| १२. | सखे मी मुरारी | ...................... | १०६ |
| १३. | मोरपीस | ...................... | ११६ |
| १४. | याला उत्तर नाही | ...................... | १२६ |
| १५. | सुंदर माणसांचं जग | ...................... | १३६ |
| १६. | ती रात्र गंधवेडी | ...................... | १४४ |
| १७. | अंतर | ...................... | १५४ |
| १८. | वास्तुपुरुष | ...................... | १५९ |
| १९. | एक होता खुळा राजा | ...................... | १६६ |
| २०. | अ गेम ऑफ चान्स | ...................... | १७७ |
| २१. | मित्रा | ...................... | १८९ |
| २२. | चंद्रलिपी | ...................... | १९८ |


✦✦✦

# निळावंतीच्या जगात तीस दिवस

पाली हिल् भागातली ती सगळीच दुकानं प्रचंड महागडी, पण तितकीच आकर्षक होती. मला हवी ती वस्तू असल्याच कुठल्यातरी दुकानात मिळेल याची मला खात्री होती. संसाराला काडीच्याही उपयोगाची नाहीत, पण घराच्या दिमाखात भर घालतील अशा गोष्टी. 'प्रेझेन्टेशन आर्टिकल्स' हे त्यांचं शोभिवंत नाव. पैसेवाल्या बायका रिकाम्या वेळी अशा ठिकाणी गर्दी करत असतात. मी त्यातली नव्हे. पण एका श्रीमंत जोडप्याला भेट देण्यासाठी मला असंच काहीतरी द्यायचं होतं. असंच म्हणजे?... नक्की काय ते मलाही ठाऊक नव्हतं.

'शहाजहाँ' हे नाव वाचलं आणि त्या दुकानात मी शिरले. दर्शनी भागी झुंबर झळाळत होतं. त्याचा प्रकाश तिथं ऐसपैस पसरलेल्या काश्मिरी गालिच्यावर पडला होता. त्या प्रकाशात गालिच्याचा कुसुंबी रंग आणखीच खुलून दिसत होता. दोन्ही अंगाला उंच उंच कपाटात अनेक चमकदार वस्तू मांडून ठेवल्या होत्या. कपाटाच्या काचेतून त्या वस्तूंकडं पाहिलं तर आपल्यालाच हाकारताहेत असं वाटावं. अशा दुकानात पावलागणिक दुकानातला एक माणूस आपली सोबत करत असतो. आपल्या नजरेकडं बघून आपल्याला काय आवडलंय हे बेरकीपणानं हेरत असतो आणि नेमक्या त्या त्या वस्तू काढून आपल्यापुढं मांडतो. त्यांची खुशामत करतो आणि ती करताना त्यांच्या (चढ्या) किमती किती योग्य आहेत, हे सौम्य शब्दांत, हसऱ्या चेहऱ्यानं सांगत राहतो. आपल्याकडे पाहात आपल्या खिशाचा तो अंदाज घेतो.

अशा वेळी माझा तरी चेहरा पडतो. तिथली प्रत्येक वस्तू छान आणि हवीहवीशी वाटते. निदान त्या सुंदर, मुलायम वस्तूवरून हळू हात फिरवावासा वाटतो. बरं बरं वाटतं- अगदी गालावरून मोरपीस फिरल्यासारखं.

पण शहाजहाँमधलं सगळंच असं काही किमती होतं, की मला खरीदण्याचा धीर होईना. तिथला माणूससुद्धा महागडा. मोजकं हसत होता. मापून बोलत होता.

राग आला. मी जे काही विकत घेणार आहे, ते पैसे मोजून, कवड्या टाकून नव्हे. मग बाजूच्या मोटरवालीवरच त्यानं लक्ष का केंद्रित करावं? मनातल्या मनात अपमानित होऊन मी त्या मऊ गालिच्यावरून बाहेर पडले. ज्या दुकानाबाहेर मोटारवाल्यांची किंवा झगेवाल्यांची गर्दी नसेल, अशा दुकानात शिरायचं ठरवलं. पायपीट करत निघाले. नाक्यावर काटकोन साधून एक छोटंसं दुकान होतं. फारसं कुणाचं लक्ष जाणार नाही असं. त्याचा दर्शनी भागच असा होता, की वाटावं, पाचशे वर्षांपूर्वी कुणीतरी हे दुकान इथं मांडलं असावं. कदाचित् आतमध्ये ॲन्टिक्स्‌ही असावीत. त्यामुळं दृश्य भाग अशा पद्धतीचा असावा. मी कुतूहलानं दुकानाचं नाव वाचलं. एका बाजूला तिरकी पट्टी मारली होती–

'फॅन्टास्टिक्'

अरे वा! नाव तर मोठं कॅची होतं. या दुकानात शिरायलाच हवं. गंमत म्हणजे त्या छोटेखानी दुकानात माझ्याखेरीज एकही गिऱ्हाईक नव्हतं. मला फार बरं वाटलं. एक गोरटेला मुलगा लगबगीनं पुढं आला. पण एकही शब्द न बोलता थोड्या अंतरावर उभा राहिला.

'बोला, तुम्हाला काय आवडेल घ्यायला? मी तुमच्या सेवेला हजर आहे.' असा अदबशीर भाव त्याच्या चेहऱ्यावर होता.

मी सावकाशीनं एक एक वस्तू न्याहाळत होते. बर्थडे म्युझिकल अल्बम, तारेवर झोके घेणारी पिसांचा फ्रॉक घातलेली परी, इवलासा कंदील–डेंजरचा इशारा देणारा त्याचा लाल रंग, बाजूला काचेच्या पारदर्शक घुमटात बसलेला गोपाळकृष्ण–काय सुरेख वस्तू होत्या एक एक! तो कृष्ण तर असा गोड होता! आत्ता बासरी वाजवणार असं वाटावं. त्याच्या कपाळावर इवलं मोरपीस. त्यात माणिक बसवलेलं. त्याचा लालचुटुक रंग मोठा लोभसवाणा दिसत होता. शोकेसमधून तो कृष्ण काढून त्यानं माझ्यासमोर ठेवला. मला काय आवडलं ते त्या पोऱ्याला नेमकं कळलं होतं. मी हसले. तोही हसून म्हणाला, ''अच्छा लगता है ना। जादा कीमती नहीं है।'' मी किंमत पाहत होते, एवढ्यात कर्रऽऽकन आवाज झाला. तो आवाज तिथल्या वातावरणाला विसंगत होता. मी मान उचलून आवाजाच्या दिशेनं पाहिलं. अगदी कोपऱ्यात एक गोल टेबल मांडलं होतं. त्या टेबलाशी एक वृद्ध बसला होता. त्याचं अस्तित्व मला आत्ताच जाणवलं. त्या कोपऱ्यातला उजेड अगदीच मंद होता आणि तो वृद्ध त्या

बाजूच्या अनेक पुरातन वस्तूतलाच एक वाटत होता. तो मुलगा म्हणाला, ''वहाँ भी बहुत अच्छी अच्छी चीजे है। बब्बाजी–'' त्यानं त्या गृहस्थाला हाकारलं. एका टोकाला असलेल्या त्या टेबलाशी मधल्या तीन पायऱ्या चढून मी गेले. तो वृद्ध तऱ्हेतऱ्हेची घड्याळं जमवून बसला होता. त्यातल्याच एका चिरक्या घड्याळानं आत्ता आवाज लावला होता. घड्याळात मला रस नव्हता. बाजूला उमर खय्यामच्या रुबाया आठवाव्यात असे सुंदर खुजे रांगेनं ठेवले होते. त्यांचे चमकदार रंग आणि नाजूक वेलबुट्टी नजरबंदी करणारी होती. आणखी एका गोष्टीकडं माझं लक्ष गेलं.

भिंतीवर जुनीपुराणी कॅलेंडरं लावली होती. मोठी मजेदार होती ती. त्यांचे आकार तर वेगवेगळे होतेच, पण त्यावरची चित्रंही मोठी आकर्षक होती. बरीचशी बायकांची. काही थेट पुराणातल्या तर काही अर्ध्या उघड्या. ज्याला जे चालेल, त्यानं ते घ्यावं. आणि एका चेहऱ्याशी मी थांबलेच.

'फॅन्टास्टिक'– माझ्या तोंडून नकळत शब्द निसटले. ही...ही बाई चित्रातली होती की खरी? तिथल्या अंधुक उजेडात ती आपल्याकडं बघून चक्क हसतेय असं वाटायचं. बाजूला आकाशाचा निळा पट्टा. त्याच्याशी स्पर्धा करणारे तिचे निळे डोळे. टपोरे. बोलके. म्हणत होते, 'या आकाशानंच माझ्या डोळ्यांचा रंग घेतलाय.' वाऱ्यानं आकाशाचा पट्टा हलला. वाटलं, आत्ता आकाश खाली वाकलंय तिच्याकडं पाहायला. तिचे हसरे, अल्लड ओठ, त्याआडचा आव्हान देणारा मिश्किलपणा. या सौंदर्याला नजर लागू नये म्हणून चेहऱ्यावर ओढलेली निळी झिरझिरीत ओढणी. ती ओढणी अधिकच उत्सुकता वाढवणारी.

रंगाची किमया, सौंदर्याची उधळण, आकृतीचा रेखीवपणा–सगळ्यात कशी लय होती, ताल होता आणि न उमटणारा पण सतत जाणवणारा एक सूरसुद्धा! मी झपाटल्यासारखी त्या चित्रापुढं उभी राहिले.

''मला हे चित्र हवंय.'' किंमत न पाहताच मी बोलले. पैसे मोजून बाहेर पडले. घरी आल्या–आल्या भिंतीवर ते लावून टाकलं. सगळी भिंतच कशी श्रीमंत झाल्यासारखी वाटली. रात्री कितीतरी वेळ मंत्रमुग्ध होऊन ते चित्र मी पाहात राहिले.

काय पाहू? किती किती पाहू? अशी खरीच कुणी असेल? अशक्य! माणसं वेडी होतील. तिला जगू देणार नाहीत, ओरबाडतील–ओरखडतील.

स्वत:चं अशांत मन तृप्त होईपर्यंत तिला खरवडत राहतील. असं काही होऊन तर ही संपली नसेल ना? जग सोडून चित्रात जाऊन बसली नसेल ना? मग एकदम वाटलं, तिचे ओठ विलग झालेयत–

''मूर्ख! पाहतेस काय? मी या रंगांची राणी. तुझ्या तेला–तुपाच्या आणि तिखटा–मिठाच्या संसारात सुकून जायला थोडीच येणाराय?''

ही बोलली का? का मला भास झाला? मी थोडी भांबावल्यासारखी झाले. असं होऊ नये म्हणून तिला हॉलच्या एका कोपऱ्यात जागा दिली. हवं तेव्हा बघावं नाहीतर चक्क दुर्लक्ष करावं. पण मला नक्की कळत होतं, येता–जाता कितीतरी वेळ मी तिच्याचकडे बघत असायची. किती सजीव, बोलकी! अन् ती जीवघेणी नजर. जीवघेणी तर काय! सगळा आकाशाचा अर्थ त्या दोन डोळ्यांत भरला होता.

त्या दिवशी शील असंच म्हणाला, ''क्यूट! काय चित्र आहे गं! जिवंत मुलगी वाटते.'' आणि कितीतरी वेळ तो त्या चित्राशीच थांबला. कोको निऊन गेला. मी वैतागानं म्हणाले,

''तू शुद्धीवर आहेस ना?''

''प्रश्न पडलाय. खरंच हिप्नोटाइझ झाल्यासारखं वाटतं गं! आय मे गो मॅड–असं पाहात राहिलो तर!''

अलीकडे असंच व्हायचं. संध्याकाळी बाहेरून आले की दिवा न लावता मी त्या सुंदरीजवळ थांबायची. बाहेरून आत शिरलेल्या अंधुक उजेडात तिचे डोळे गडद निळे वाटायचे. अशा हुरहुरत्या संध्याकाळी जगाचं सगळं दु:ख त्या दोन डोळ्यांत साठल्यासारखं वाटायचं. का? असं का? की हे माझ्याच मनाचे खेळ?

एका रात्री तर मला चक्क नि:श्वास ऐकू आला. कुणाचा? कोण आहे इथं आसपास? मीच मी, एकटी एक. मग उसासले कोण? माझ्याच मनातून कुणी बाहेर पडलं का?

ही...ही नीलमण्यांतून जग पाहणारी कॅलेंडरवाली तर नव्हे? म्हणजे हे चित्र–ही बाई जिवंत आहे? माझ्या धमन्यांतलं रक्त एकदम गोठल्यासारखं झालं. डोक्याखालची उशी गरम झाली. त्यातून वाफा निघतायतसं वाटलं. मोठ्यानं किंकाळी फोडाविशी वाटली. पण जागची न हलता डोळे मिटून मी पडून राहिले.